# संस्थास्तरीय समुपदेशन फेरी दुसरा टप्पा दि. ०३/०९/२०२४ ते दि. ०६/०९/२०२४

१. संस्था स्तरीय प्रवेशासाठी उपलब्ध जागाः

१.१. सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील संस्थास्तरीय समुपदेशन फेरी पहिला टप्प्यानंतर रिक्त राहिलेल्या जागा पुढील संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी उपलब्ध राहतील.

१.२. उमेदवाराना त्यांच्या प्रवेशात प्रवेश करून "Admission Actiunies Vacant Seat Report या टॅबव्दारे संस्थानिहाय रिक्त जागांचा अद्यावत (Real time) तपशील पाहता येईल.

२. संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी नोंदणी करणे (Mark Attendance):

२.१. पात्र उमेदवारांना संस्थांची निवड करून आगावू (Advance) नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

३. समुपदेशन फेरी: दि. ०३/०९/२०२४ ते दि. ०६/०९/२०२४

३.१. प्रदेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी ते प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शासकीय या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीशः हजर राहून समुपदेशन फेरीकरिता सकाळी ८.०० वाजेपासून दुपारी १२.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदवावी

३.२. दुपारी १२.०० वाजेपर्यंत हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून पहिली गुणवत्ता यादी दुपारी १.०० वाजता संस्थास्तरावर तयार करण्यात येईल व उमेदवारांना सदर यादीनुसार त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता त्याच दिवशी बोलविण्यात येईल.

३.३. संबंधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत समुपदेशन फेरीसाठी हजर असलेल्या उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा उमेदवाराची मागणी व उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल.

३.४. समुपदेशन फेरीमध्ये उपलब्ध सर्व जागा हया सर्वसाधारण जागा म्हणून समजल्या जातील

३.५. समुपदेशन फेरीसाठी हजेरी नोंदवली असली तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील जागांचे वाटप हे पूर्णतः उपलब्ध रिक्त जागा व उमेदवाराची पात्रता यावर अवलंबून असेल.

३.६. सदर प्रदेशफेरीत जागा बहाल करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्याच दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्राच्या पड़ताळणीनंतर प्रवेश निश्चितीची प्रत्यक्ष कार्यवाही करावी.

३.७. उमेदवाराने समुपदेशन फेरीसाठी व्यक्तिशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. उमेदवाराच्या अपरोक्ष त्याचे नातेवाईक / पालक / मित्र व अन्य कोणीही व्यक्ती समुपदेशन फेरीसाठी उमेदवाराच्या वतीने उपस्थित राहण्यास परवानगी नाही.

३.८. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजून प्रवेशासाठी खुली करण्यात येईल.